# जिल्हाधिकारी कार्यालय, जळगांव.

## अतिवृष्टि व पुर परिस्थिती कालीन

## प्रमाणित कार्य पध्दती (एस.ओ.पी.)

## प्रमाणिक कार्य पध्दती (एस.ओ पी.)

| अ.न | विभागाचे नाव | अधिकारी नाव/पदनाम | कोणते काम करणार | नियंत्रण अधिकाऱ्यांचे नाव |
|---|---|---|---|---|
| १ | पोलीस | जिल्हा पोलीस अधिक्षक | १) पुराचे पाणी धरणातुन सुटल्यानंतर तात्काळ पुर रेषेताल गावांची संपर्क साधतील व परिस्थितीची माहिती नियंत्रण कक्षास देतील.<br>२) पुर रेषेतील गावातील पोलीस यंत्रणा तात्काळ पुर पाहावयास जाणाऱ्या लोकांना प्रतिबंध करण्याचे आदेश देतील.<br>३) पूर रेषेतील लोकांना सुरक्षित स्थळी पोहचवण्यासाठी गांव स्तरावर यंत्रणेचा सहभाग घेवून हालवतील.<br>४) आपदग्रस्त क्षेत्रातील वाहतून सुरळीत राहील याची व्यवस्था करतील.<br>५) आपदग्रस्त क्षेत्रातील चोऱ्या चपाट्या यावर नियंत्रण ठेवून कायदा व सुव्यवस्था राखतील. | |
| २ | आरोग्य | जिल्हा शल्य चिकित्सक/ जिल्हा आरोग्य अधिकारी | १) नियंत्रण कक्षेत पुर्व सुचना मिळताच हजर होतील व मिळालेल्या सुचनेनुसार आपल्या विभाग प्रमुखानुसार कार्यवाही करतील.<br>२) आपदग्रस्त भागात तात्काळ प्रथमोचार केंद्र उभारणे व कार्यान्वीत करणे व त्याची माहिती जिल्हाधिकारी कार्यालय नियंत्रण कक्षास देतील.<br>३) आपदग्रस्त उपचार केंद्रात नियंत्रण कक्ष उघडुन त्यात दूरसंचार व्यवस्था अखंड चालू ठेवतील.<br>४) उपलब्ध औषधी, जीवन रक्षक औषधी, किडक नाशके उपलब्ध राहणे बाबत वेळेवेळी माहिती घेतील व त्याप्रमाणे उपलब्ध करून देतील.<br>५) आणीबाणीच्या काळात स्थानीक डॉक्टर व स्वयंसेवक यांना संघटीत करतील व त्यांची मदत घेतील.<br>६) रोगराई पसरू नये यासाठी फवारणी व उपाययोजना करतील.<br>७) गंभीर स्वरूपातील पेशंटसा तात्काळ उपचारासाठी उचीत ठिकाणी हलवतील. | |
| ३) | महाराष्ट्र जीवन प्राधिकरण | कार्यकारी अभियंता | १) पाण्याची टाकी, पंप, पाणीसाठा, पाण्याची साधणे यांची तपासणी करतील.<br>२) पाणी पुरवठा करणारी यंत्रणा बंद पडल्यास दुरूस्त करणे अथवा पर्यायी व्यवस्था उपलब्ध करणे (उदा.टँकर)<br>३) आपदग्रस्त भागात सुरक्षित पिण्याचे पाणी उपलब्ध करून देणे व क्ष्याची माहिती जिल्हा नियंत्रण कक्षास देणे. | |
| ४) | पाटबंधारे | कार्याकरी अभियंता | १) धरण क्षेत्रात पडणाऱ्या पावसाची व धरण साठ्याची दर तासास नेंद घेणे व त्याची माहिती जिल्हा नियंत्रण कक्षास देणे<br>२) धरणातुन पाणी सोडण्याची आवश्यकता असल्यास | |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | | त्याची माहिती कमीत कमी ३ तास आगोदर नियंत्रण कक्षास देणे.<br>३) दर तासास पाणी सोडण्याच्या प्रवाहाची माहिती व बाधित होणाऱ्या गावांची माहिती नियंत्रण कक्षास देणे.<br>४) १ ते ३ तास पाणी सोटण्याआधी बाधीत होणाऱ्या गांवांच्या सरपंच/तलाठी/ग्राम सेवक/पोलीस यंत्रणेस माहिती देणे.<br>५) धरण क्षेत्रात २४ तास उपस्थित राहणे व लिकेजची तपासणी करणे व त्याचा रिपोर्ट नियंत्रण कक्षास देणे.<br>६) बाधित होणाऱ्या गावांना विभागाकडील उपलब्ध साधणे उपलब्ध करून ठेवावी. | |
| ५ | सार्वजनिक बांधका विभाग | कार्यकारी अभियंता | १) धोकादायक गावातील उपलब्ध यंत्रणेस त्वरीत कार्यावाहीचे आदेश देणे.<br>२) आपादग्रस्त भागातील रस्ते, पुल, धरणे, सार्वजनिक सोयी पुरविणारी साधणे इ. ची तात्काळ दुरूस्ती करणे.<br>४) गावातील रस्ते व आपतकालील रस्ते यांची माहिती व नकाशे उपलब्ध करून ठेवणे.<br>५) बाधीत होणाऱ्या गावांना विभागाकडील उपलब्ध साधने उपलब्ध करून देणे ( उदा. डंफर, टॅकर. अर्थमुव्हर, बुलडोजर, जे.सी.बी इ.) | |
| ६ | म.रा.वि.वि. कंपनी | अधिक्षक अभियंता | १) बाधीत भगातील पॉवर स्टेशन. सब स्टेशन. फिडरर्स, ट्रान्सफार्मर इ.चा विद्युत प्रवाह तात्काळ खंडीत करणे.<br>२) महत्वाच्या ठिकाणाचा उदा. विद्युत गृह, दवाखाने, बसस्थानक यांचा विद्युत प्रवाह अबाधीत ठेवणे.<br>३) आपदग्रस्त भागातील धोकादायक ट्रान्स फार्मर पॉवर स्टेशन इ.ना धोक्याची आगाऊ सुचना देणे व विद्युत प्रवाह तात्काळ खेडीत करणे.<br>४) आपगद्रस्त भागीतल विद्युत पुरवठे सुरक्षिततेच्या खात्रीनंतर तात्काळ सुरळीत करणे. | |
| ७ | दुरसंचार | उपविभागीय अधिकारी | १) दुरध्वनी सुरळीत चालु असण्याची खात्री करणे<br>२) आपादग्रस्त भागात दुरध्वी सुरळीत चालू ठेवण्याच्या दृष्टीने निर्माण होणारे अडथळे दुर करणे.<br>३) आपदग्रस्त भागातील आरोग्य शिबीर व उतर शिबीर यामध्ये दुरध्वनी संपर्काची व्यवस्था करणे<br>४) महत्वाच्या विभागांचा संपर्क अबाधित राहील याची दक्षता घेणे. | |
| ८ | कृषी विभाग | जिल्हा अधिक्षक कृषी अधिकारी | १) बाधीत होणाऱ्या गावातील जलसिंचनाच्या स्त्रोतांची व खेल पृष्ठ भागांची जेथे पाणी साचु शकते त्याची माहिती उपलब्ध करून देणे.<br>२) आपदग्रस्त भागातील उपलब्ध मनुष्यबळ सहकार करण्यास मदत करणे.<br>३) पिकांच्या हानीचा व झिज झालेल्या जमिन क्षेत्रांचा प्राथमिक अहवाल तयार करणे व नियंत्रण कक्षात पाठविणे. | |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | | ४) बाहेरील उपलब्ध मदत व मनुष्यबळ यांचा पुनर्वसनासाठी मदत करणे. | |
| ९ | पशु संवर्धन | जिल्हा पशु संवर्धन अधिकारी | १) आपतकालीन भागातील पशु धनास स्थलांतरीत करण्यासाठी सुरक्षित क्षेत्र व स्थान याकडे हालवणे<br>२) पशु धन केंद्र व उपचार केंद्र यांची स्थापना करणे व उपचार सुरू करणे.<br>३) पशुसाठी आवश्यक ती औषधे साठवणे व आवश्यक असल्यास वरील स्तरावरून मागवून घेणे.<br>४) पशुसाठी चारा व पाणी यांची व्यवस्था करणे. | |
| १० | परीवहन महामंडळ | आगार व्यवस्थापक | १) आपदग्रस्त गावांच्या जवळ बसेस उपलब्ध करून ठेवणे व लोकांची व्यवस्था करणे.<br>२) उपलब्ध बसेसच्या ठिकाणी दुरध्नीची खात्री करणे<br>३) २४ तास चालकांच्या ड्युट्या लावणे.<br>४) पर्यायी रस्त्यांची चालकांना माहीती देणे. | |
| ११ | वन विभाग | उप वन संरक्षक | १) वन विभागीत पुर,रस्ते, जोडरस्ते इ.ची त्वरीत दुरूस्ती करणे.<br>२) झाडे पडलेली असल्यास ट्री कटर, रोप इ. वापरून वाहतुक सुरळीत करणे. | मुख्यवनसंरक्षक |
| १२ | गृहरक्षक दल | समादेशक | १) पुररेषेतील लोकांना सुरक्षित स्थळी हलविण्याच्या सुचना देणे.<br>२) पुर पाहावयास जाणाऱ्या लोकांना मज्जाव करणे.<br>३) पुरात कोणाही सापडणार नाही याची खात्री करणे. | |
| १३ | महानगर पालिका/ नगरपालिका | आयुक्त/मुख्याधिकारी | १) सर्व गटारे /ड्रेनेज मोकळे करून घेणे<br>२) पुररेषेतील लोकांना सुरक्षित स्थळी हालविण्याच्या सुचना देणे<br>३) पुर पाहावयास जाणाऱ्या लोकांना मज्जाव करणे.<br>४) अग्निशमन विभाग दक्ष करणे.<br>५) तटावर पोहोणारे कर्मचारी व अग्निशमन कर्मचारी तयात करणे.<br>६) तटावरील लोकांना सुरक्षित स्थळी हलविणे | |
| १४ | पुरवठा | पुरवठा अधिकारी | १) पुररेषेतील गावांतील स्वस्थ धान्य दुकानात धान्य उपलब्ध करणे.<br>२) शिबीरात धान्य उपलब्ध करून देणे. | |